सकाळ




**कोल्हापूर : कॉमर्स कॉलेजच्या काव्या शिरगावी हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करताना मान्यवर.**

# ‘आविष्कार’मध्ये कॉमर्स कॉलेजचे यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने आयोजित केलेल्या आविष्कार संशोधन महोत्सवामध्ये देशभक्त रत्नप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सने यश मिळवले. बीबीए विभागातील पदवीपूर्व स्तरावरील काव्या शिरगावी यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, कौन्सिल ऑफ एज्युकेशन अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, विभागप्रमुख प्रा. सीमा बेनाडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

सकाळ



**कोल्हापूर : संत जगनाडे महाराज यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, शिक्षक व अधिकारी.**

# विद्यापीठात संत जगनाडे महाराज जयंती

**कोल्हापूरः** संत जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात सकाळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि मराठी अधिविभाग प्रमुख तथा संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

0 9 DEC 2022

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# सैफ केंद्र संशोधकांना समर्पित

## प्रा. आर. जी. सोनकवड; 'स्तुती' अंतर्गत कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाचे सैफ डी. एस. टी केंद्राचा सर्व संशोधकांना चांगला उपयोग होत आहे. हे केंद्र देशभरातील संशोधकांना समर्पित आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले. स्तुती कार्यशाळेच्या सत्रात ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठात स्तुती कार्यशाळा सुरू आहे. आज झालेल्या पहिल्या सत्रात डॉ. डी. एस. भांगे यांनी 'एक्स-रे डिफ्रॅक्शन स्पेक्ट्रोस्कोप' या उपकरणाविषयी सविस्तर माहिती दिली. शास्त्रीय आणि औद्योगिक क्षेत्राला कशाप्रकारे याचा वापर होतो हे सुद्धा नमूद केले. द्वितीय सत्रात प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी 'ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप' या विषयी मार्गदर्शन केले. हे उपकरण नॅनो पार्टिकल्स ओळखण्याचे एकमेव तंत्रज्ञान असून याविषयी माहिती आणि त्याचे उपयोग यांनी विशद



कोल्हापूर : मंगळूर विद्यापीठाचे प्रा. करुणाकरा यांचा सत्कार करताना 'स्तुती'चे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे.

केले. त्याचबरोबर सैफ डीएसटी केंद्र कोल्हापूर येथील या अत्याधुनिक उपकरणांची सुविधा वापरण्यासाठी आय एस टी एम या पोर्टल द्वारे कशाप्रकारे नोंदणी करावी याविषयी देखील त्यांनी सविस्तर माहिती दिली. मंगळूर विद्यापीठाच्या प्रा. करुणाकरा नरेगुंडी यांचे कार्बन डेटिंग आणि त्याचे उपयोग या बद्दल नवोदित संशोकांना मार्गदर्शन लाभले. कोणत्याही झाडाचे अथवा प्राण्याचे वय ओळखण्याकरिता या तंत्राचा कसा उपयोग होतो याविषयी



सविस्तर माहिती दिली. त्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा परिसर अनुभवला. लीड बोटॅनिकल गार्डनची सफर केली आणि जैवविविधतेचा मनमुराद आनंद घेतला.

द्वितीय सत्रात शिवाजी विद्यापीठाचे स्तुति प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी "एक्स-रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोप (एक्स.पी.एस) " या उपकरणाविषयी सखोल मार्गदर्शन केले. या उपकरणाच्या माध्यमातून आपण पदार्थाचे किंवा ननो-पदार्थाचे विविध गुणधर्मांचा अभ्यास करून सदर पदार्थाची उपयुक्तता कशासाठी आहे, याविषयी सविस्तर माहिती दिली. सर्व सहभागी शिक्षक प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांना सैफ केंद्रातील उपकरणांचे गटानुसार प्रात्यक्षिक दिले गेले. सहभागींपैकी काहींनी आणलेले सॅम्पल देखील येथे टेस्ट करून दिले. याच प्रकारे दररोज संध्याकाळी विविध उपकरणे सहभागींना प्रत्यक्षपणे हाताळायला मिळणार आहेत. हे केंद्र संशोधकांना समर्पित असल्याचे प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी या वेळी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2022
तरुण भारत


# देशभरातील संशोधकांसाठी 'सैफ डीएसटी' खुले

## स्तुती समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांची माहिती : शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

'ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप' उपकरण नॅनो पार्टिकल्स ओळखण्याचे एकमेव तंत्रज्ञान आहे. अनेक क्षेत्रात या उपकरणाचा उपयोग केला जातो. शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटी केंद्रातील अत्याधुनिक उपकरणांची सुविधा वापरण्यासाठी देशभरातील संशोधकांसाठी खुली आहे. तसेच आयएसटीएम या पोर्टलद्वारे कशाप्रकारे नोंदणी करावी यासंदर्भातील माहिती स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या सैफ डीएसटी, सीएफसी विभागामध्ये स्तुति अंतर्गत कार्यक्रम सुरू आहे. या कार्यशाळेत विविध उपकरणांची माहिती देताना ते बोलत होते. सर्व सहभागींना अत्याधुनिक उपकरणांची माहिती देण्यात आली. 'एक्स-रे डिफ्रॅक्शन स्पेक्ट्रोस्कोप' या उपकरणाचा शास्त्रीय आणि औद्योगिक क्षेत्राला फायदा होतो, असे डॉ. डी. एस. भांगे यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती कार्यक्रमात मंगळूर विद्यापीठाचे प्रा. करुणाकरा यांचा सत्कार करताना स्तुतिचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे.

मंगळूर विद्यापीठाच्या प्रा. करुणाकरा नरेगुंडी यांनी कार्बन डेटिंग आणि त्याचे उपयोगबद्दल मार्गदर्शन केले. कोणत्याही झाडाचे अथवा प्राण्याचे वय ओळखण्याकरिता या तंत्राचा कसा उपयोग होतो याविषयी माहिती दिली.

शिवाजी विद्यापीठातील स्तुति प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी 'एक्स-रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोप' या उपकरणाविषयी मार्गदर्शन केले. या उपकरणाच्या माध्यमातून आपण पदार्थाचे किंवा ननो-पदार्थाचे विविध गुणधर्मांचा अभ्यास करून सदर पदार्थाची उपयुक्तता कशासाठी आहे, याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा परिसरासह लीड बोटॅनिकल गार्डनची सफर केरीत विद्यापीठातील जैवविविधता पाहून आनंद व्यक्त केला. सहभागींपैकी काहींनी आणलेले सॅम्पलदेखील टेस्ट केले. डॉ. सोनकवडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सहभागी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी कौतुक केले.

डॉ. सोनकवडे यांनी भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग आणि शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले. दरम्यान, सहभागी प्रशिक्षणार्थींची राहण्याची आणि जेवणाची उत्तम सोय केली आहे. तर गुरुवारी सर्व सहभागींनी अंबाबाईचे दर्शन घेतले. तसेच कोल्हापुरातील प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या.

0 9 DEC 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. मोहोळकर टॉप शास्त्रज्ञांमध्ये

## अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने केले सर्वेक्षण

**हातकणंगले :** अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने केलेल्या सर्वेक्षणात पुन्हा एकदा शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांना जागतिक क्रमवारीत टॉप २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांच्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय बहुमान मिळाला आहे.

प्रबळ आत्मविश्वास असेल तर कोणतीही अवघड गोष्ट आपण सहज शक्य करू शकतो, हे डॉ. मोहोळकर यांनी सिद्ध करून दाखविले. सौरऊर्जा क्षेत्रात आज त्यांचे नाव अभिमानाने घेतले जाते. प्रयोगशाळेत कित्येक वेळा आलेल्या अपयशाला खचून न जाता



त्यांनी ऊर्जा साठवणीच्या संशोधनामध्ये यश मिळविले आहे. प्रयत्नांची उंची वाढवली की आकाशसुद्धा ठेंगणे वाटू लागते हे त्यांच्याकडे बघून समजते. परदेशातील नामवंत शास्त्रज्ञ त्यांच्या संशोधनामध्ये आजही डॉ. मोहोळकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य घेतात. याचबरोबर अल्पेर-डोजर (एडी) सायंटिफिक इंडेक्सने २०२२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या टॉप जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीमध्ये डॉ. मोहोळकर यांना स्थान मिळाले आहे. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


09 DEC 2022 पुण्यनगरी

# लोकमाध्यमातील ज्ञानाचे जतन आवश्यक

## प्रा. नंदकुमार मोरे, पत्रकारिता अधिविभागात 'संवादाचे प्रभावी साधन : लोकमाध्यमे' कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकमाध्यमांनी घडवला आहे. लोकमाध्यमात जनमत निर्मितीची प्रचंड मोठी क्षमता आहे. ही क्षमता लक्षात घेऊन लोकमाध्यमांचे आणि लोकमाध्यमातून आलेल्या ज्ञानाचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'संवादाचे प्रभावी साधन-लोकमाध्यमे' या



**शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागामध्ये आयोजित 'जनसंवादाची प्रभावी साधने-लोकमाध्यमे' या कार्यशाळेत बोलताना मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे.**

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

पत्रकारिता अधिभागात संवादाचे प्रभावी साधन-लोकमाध्यमे या विषयावर दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रा. मोरे म्हणाले, महात्मा फुले यांच्या कार्याचा पाया लोकमाध्यमेच होती. छत्रपती शिवरायांचा पोवाडा लिहून त्यांनी छत्रपतींचे विचार लोकमाध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवले. लोकसमूहाचा आवाज आणि लोकसमूहाचे शहाणपण या दोन्ही गोष्टींचे दस्तऐवजीकरण केले पाहिजे.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये सुनीलकुमार सरनाईक यांनी भजन : संवादचे माध्यम या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध भजनांच्या प्रकारांविषयी माहिती दिली. विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. विभागाची विद्यार्थिनी पल्लवी पाटील हिने आभार मानले. याप्रसंगी डॉ. सुमेधा साळुंखे, जर्नालिझम आणि मास काम्युनिकेशन विभाग, मराठी विभाग, पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात जगनाडे महाराज यांना अभिवादन

कोल्हापूर : संत जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात गुरुवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि मराठी अधिविभाग प्रमुख तथा संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात उद्या 'इंटर्नशिप फेअर'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी (दि. १०) सकाळी ९ वाजता 'इंटर्नशिप फेअर'चे आयोजन केले आहे. हा मेळावा सन २०२१ व २०२२ मधील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी खुला आहे, अशी माहिती संगणकशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कविता ओझा यांनी दिली.

संगणकशास्त्र अधिविभागाने विद्यापीठाचा सेंट्रल प्लेसमेंट कक्ष आणि आय.टी. असोसिएशन ऑफ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने फेअर आयोजित केला आहे. त्यामध्ये २५हून अधिक कंपन्या सहभागी होणार असून विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्याकडे इंटर्नशिप करण्याची संधी या उपक्रमाद्वारे प्राप्त होणार आहे. एम.सी.ए., एम.एस्सी. (संगणकशास्त्र), एम.एस्सी. टेक. (गणित), एम.ई., एम.टेक., बी.ई., बी.एस्सी., बी.सी.ए. किंवा तत्सम विद्याशाखांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अंतिम वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना या मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. विद्यापीठाव्यतिरिक्त अन्यत्र शिकणारे विद्यार्थीही या मेळाव्यास उपस्थित राहू शकतात. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभाग इमारतीमधील संगणकशास्त्र अधिविभागात विद्यार्थ्यांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. ओझा यांनी केले.

लोकमत



'निमॉस्पीस रुधिरा'



निमॉस्पीस सलीमअली



निमॉस्पीस आगाईगंगा

# कोल्हापूरच्या संशोधकाने शोधल्या पाच नव्या पाली

## अक्षय खांडेकर या संशोधकांची कामगिरी

**संदीप आडनाईक**

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागातील संशोधक अक्षय खांडेकर यांनी तामिळनाडूमधील शेव्हरॉय या पर्वतरांगेतून पाच नव्या आश्चर्यकारक नवीन पालींच्या प्रजातींचा शोध लावला आहे. ठाकरे वाइल्ड लाइफ फाउंडेशनच्या तेजस ठाकरे आणि ईशान अगरवाल यांच्या सहकार्याने त्यांनी या दुर्मीळ पालींचा शोध लावला असून, त्यातील एका प्रजातीचे नाव सलीम अली यांच्या सन्मानार्थ ठेवले आहे तर इतर प्रजातींचे त्यांच्या प्रकारानुसार आणि प्रजातींच्या वैशिष्ट्यांसाठी नामकरण केले आहे.



अक्षय खांडेकर



तेजस ठाकरे

जगभरात पालींच्या १५० हून अधिक प्रजाती आढळून येतात. आत्तापर्यंत निमॉस्पीस प्रजातीच्या ७० हून अधिक प्रजातींची नोंद होती, त्यात या पाच प्रजातींची भर पडली आहे. निमास्पिस हा भारतातील पृष्ठवंशीय प्राण्यांमधे सर्वाधिक प्रजाती असणारा जीनस आहे.

-अक्षय खांडेकर, संशोधक.

0 9 DEC 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक प्रश्नांना भिडण्याचे पोवाड्यात सामर्थ्य

## डॉ. आझाद नायकवडी; शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

समाजातील विविध प्रश्नांची भिडण्याची क्षमता पोवाड्यामध्ये असते. एवढेच नाही तर पोवाडा प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात उभा राहून भूमिका घेतो, असे प्रतिपादन शाहीर विशारद डॉ. आझाद नायकवडी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता अधिविभागातर्फे दोन दिवसीय कार्यशाळेत पोवाड्यातून संवाद विषयावर ते बोलत होते. यावेळी शिवशाहीर राजू राऊत यांनीही मार्गदर्शन केले स्वागत व प्रास्ताविक पत्रकारिता विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

पुढारी

# इंटर्नशिप फेअरचे उद्या विद्यापीठात आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात शनिवारी (दि.१०) अभिनव अशा 'इंटर्नशिप फेअर-२०२२'चे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा २०२१ व २०२२ मधील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी खुला आहे, अशी माहिती संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा यांनी दिली. संगणकशास्त्र अधिविभागाने विद्यापीठाचा सेंट्रल प्लेसमेंट कक्ष व आयटी असोसिएशन ऑफ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे. एम.सी.ए., एम. एस्सी. (संगणकशास्त्र), एम.एस्सी. टेक. (गणित), एम. ई., एम. टेक., बी. ई., बी. एस्सी., बी. सी. ए. किंवा तत्सम विद्याशाखांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अंतिम वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मेळाव्यात सहभागी होता येईल. विद्यापीठाव्यतिरिक्त अन्यत्र शिकणारे विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित राहू शकतात. तंत्रज्ञान विभाग इमारतीमधील संगणकशास्त्र अधिविभागात मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. जी. 'एस. राशिनकर, आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी केले आहे.

पुढारी

# ‘दर्जेदार अभिव्यक्तीसाठी समाज माध्यमांचा प्लॅटफॉर्म वापरावा’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दर्जेदार अभिव्यक्तीसाठी समाज माध्यमांचा प्लॅटफॉर्म वापरावा. उच्च प्रतीचे वैचारिक आदान-प्रदान होऊन समाजमानस घडविणे, अगर मतनिर्मिती होणे यासाठी सोशल मीडिया महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे सायबर जागरूकता दिवस कार्यक्रमांतर्गत मराठी विभागाच्या वतीने आयोजित ‘समाज माध्यमे आणि सायबर सुरक्षा’ या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे होते.

डॉ. जत्राटकर म्हणाले, समाजमाध्यम योग्य पद्धतीने हाताळण्याचे भान वापरकतर्त्यांना असले पाहिजे. मानवाच्या समाजशीलतेच्या गरजेपोटी समाजमाध्यमे निर्माण झाली. त्याला माहिती तंत्रज्ञानाची जोड मिळाली आहे. या नवतंत्रज्ञानाचा हात धरून आलेल्या गेमिंग व अतिरेकी वापरामुळे तरुणांमध्ये हिंसेची तीव्रता वाढली आहे. समाजमाध्यमे वाईट नाहीत. मात्र, त्यांचा वापर कोणत्या कारणासाठी करायचा हे ज्याच्या त्याच्या हातात आहे. त्यांचा हेतू काय आहे यावर त्याचे भलेबुरेपण अवलंबून आहे. डॉ. पी एस. लोंढे यांनी प्रास्ताविक केले. एस. डी. भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले.

0 9 DEC 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठास तृतीय क्रमांक



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवामध्ये विजेता शिवाजी विद्यापीठाचा संघ.

**कोल्हापूर :** औरंगाबाद येथे झालेल्या २४ व्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने महिला व पुरुष दोन्ही गटांमध्ये जनरल चॅम्पियनशिपमध्ये तृतीय क्रमांक पटकाविला. स्पर्धेत राज्यातील २२ विद्यापीठांच्या संघांनी सहभाग घेतला. यात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने यश संपादन केले. ॲथलेटिक्स मुली व मुलांच्या संघाने दोन्ही गटांत प्रथमच चॅम्पियनशिप मिळवून इतिहास घडविला. त्याचबरोबर सांघिक खेळामध्ये कबड्डी (पुरुष) व बास्केटबॉल महिला संघाने रजत पदक प्राप्त केले. खो-खो (महिला व पुरुष) व बास्केटबॉल (पुरुष) हे तिन्ही संघ कांस्यपदकांचे मानकरी ठरले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात संत जनागडे महाराज जयंती साजरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संत जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि मराठी अधिविभागप्रमुख तथा संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

0 9 DEC 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंटर्नशिप फेअर-२०२२ चे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात येत्या शनिवारी (दि. १०) अभिनव अशा 'इंटर्नशिप फेअर-२०२२'चे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सन २०२१ व २०२२ मधील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी खुला आहे, अशी माहिती संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा यांनी दिली.

डॉ. ओझा यांनी दिलेल्या माहितीनुसार, संगणकशास्त्र अधिविभागाने विद्यापीठाचा सेंट्रल प्लेसमेंट कक्ष आणि आय.टी. असोसिएशन ऑफ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा 'इंटर्नशिप फेअर-२०२२' आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये २५ हून अधिक कंपन्या सहभागी होणार असून, विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्याकडे इंटर्नशिप करण्याची संधी या उपक्रमाद्वारे प्राप्त होणार आहे. एम.सीए., एम.एस्सी. (संगणकशास्त्र), एम.एस्सी. टेक. (गणित), एम.ई., एम. टेक., बी.ई., बी.एस्सी., बी.सी.ए. किंवा तत्सम विद्याशाखांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अंतिम वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना या मेळाव्यात सहभागी होता येणार आहेत. विद्यापीठाव्यतिरिक्त अन्यत्र शिकणारे विद्यार्थीही या मेळाव्यास उपस्थित राहू शकतात. शनिवारी (दि. १०) सकाळी ९ वाजल्यापासून विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभाग इमारतीमधील संगणकशास्त्र अधिविभागात विद्यार्थ्यांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# ‘आविष्कार’मध्ये कॉमर्स कॉलेजचे यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने आयोजित केलेल्या आविष्कार संशोधन महोत्सवामध्ये देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूरमधील विभागातील पदवीपूर्व स्तरावरील काव्या शिरगावी यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, कौन्सिल ऑफ एज्युकेशन अध्यक्षा राजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, विभागप्रमुख प्रा. सीमा. एस बेनाडे यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 DEC 2022 पुण्यनगरी

# दर्जेदार अभिव्यक्तीसाठी समाज माध्यमांचा प्लॅटफॉर्म वापरावा

## डॉ. आलोक जत्राटकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दर्जेदार अभिव्यक्तीसाठी समाज माध्यमांचा प्लॅटफॉर्म वापरावा. उच्च प्रतीचे वैचारिक आदान-प्रदान होऊन समाजमानस घडविणे अगर मत निर्मिती होणे यासाठी सोशल मीडिया महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने सायबर जागरूकता दिवस कार्यक्रमांतर्गत मराठी विषयाच्या वतीने आयोजित 'समाज माध्यमे आणि सायबर सुरक्षा' या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. पी. एस. लोंढे यांनी केले. सूत्रसंचालन एस. डी. भोसले यांनी केले. डॉ. जत्राटकर म्हणाले की, समाज माध्यम योग्य पद्धतीने हाताळण्याचे भान वापरकर्त्यांना असले पाहिजे. मानवाच्या समाजशीलतेच्या गरजेपोटी समाज माध्यमे निर्माण झाली आहेत. त्याला माहिती तंत्रज्ञानाची जोड मिळाली आहे. या नवतंत्रज्ञानाचा हात धरून आलेल्या गेमिंग व अतिरेकी वापरामुळे तरुणांमध्ये हिंसेची तीव्रता वाढली आहे. मुलांना गेम खेळू नका, मोबाईल फार वापरू नका, असे सांगितल्यावर आत्महत्या, खून झालेले आहेत. समाज माध्यमे वाईट नाहीत; मात्र त्याचा वापर कोणत्या कारणासाठी केला जातो, ते कोणाच्या हातात आहे, त्यांचा हेतू काय आहे, यावर त्याचे भलेबुरेपण अवलंबून आहे. स्वच्छ अभिव्यक्तीसाठी हे महत्त्वाचे आहे. समाजमानस कलुषित करण्यासाठी समाज माध्यमाचा वापर टाळला पाहिजे. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 9 DEC 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रश्नांना भिडण्याचे पोवाड्यात सामर्थ्य

## शाहीर नायकवडी, राजू राऊत यांचे प्रतिपादन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : समाजातील विविध प्रश्नांची भिडण्याची क्षमता पोवाड्यात असते. एवढेच नाही तर पोवाडा प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात उभा राहून भूमिका घेतो, असे प्रतिपादन शाहीर विशारद डॉ. आझाद नायकवडी आणि शिवशाहीर राजू राऊत यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता अधिविभागातर्फे आयोजित केलेल्या दोनदिवसीय कार्यशाळेत दुसऱ्या दिवशीच्या सत्रात 'पोवाड्यातून संवाद' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. नायकवडी म्हणाले, की पोवाड्यामध्ये इतिहास, वर्तमान आणि भविष्याचा वेध घेतला जातो. सूर-तालाशी त्याचा अत्यंत जवळचा संबंध आहे. शाहिरावर आघात झाल्यानंतर उच्च कोटीचा पोवाडा जन्म घेतो.



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना शाहीर डॉ. आझाद नायकवडी.

शाहीर आत्माराम पाटील, अण्णाभाऊ साठे आदींनी शाहिरीच्या माध्यमातून समाज व्यवस्थेवर सडकून टीका केली होती. अलीकडे समाजात मेंदूची गुलामगिरी वाढलेली आहे. अशा गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी पोवाडा मदत करू शकतो.

डॉ. राजू राऊत म्हणाले, की छत्रपती शिवरायांच्या कालखंडापासून आजपर्यंत पोवाडा आहे जनमत निर्मितीसाठी उपयुक्त माध्यम म्हणून प्रचलित आहे. हा वीरश्रीचा काव्य प्रकार असून ब्रिटिशांच्या विरोधातही जनमत तयार करण्यासाठी पोवाडा उपयोगी ठरला. राजर्षी शाहू महाराजांनी याला बळ दिले. महात्मा फुले यांचे विचार जनमानसात पोहोचवण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी शाहिरांना बळ दिले. समाजात शाहिराचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. शाहिराच्या तालावर समाजाचा तोल अवलंबून असतो.' पत्रकारिता विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. या वेळी सहायक प्राध्यापक डॉ. सुमेधा साळुंखे, निवृत्त प्राचार्य डॉ. पी. टी. सावंत, डॉ. मनीषा नायकवडी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठात उद्या इंटर्नशिप फेअर

**कोल्हापूर, ता. ८ :** शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. १०) अभिनव अशा 'इंटर्नशिप फेअर-२०२२'चे आयोजन केले आहे. मेळावा सन २०२१ व २०२२ मधील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी खुला आहे, अशी माहिती संगणकशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कविता ओझा यांनी दिली.

सकाळी ९ वाजल्यापासून विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभाग इमारतीमधील संगणकशास्त्र अधिविभागात विद्यार्थ्यांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी डॉ. ओझा यांच्यासह केंद्रीय रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर, आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील आणि सहकारी परिश्रम घेत आहेत. नोंदणी व माहितीसाठी ०२३१-२६०९३४७ या क्रमांकावर इच्छुकांनी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 DEC 2022 सकाळ

# शिवाजी विद्यापीठास तृतीय सर्वसाधारण विजेतेपद



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ स्पर्धेत यशस्वी ठरलेला शिवाजी विद्यापीठ क्रीडा संघ.

कोल्हापूर, ता. ८ : औरंगाबाद येथे झालेल्या २४ व्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने महिला व पुरुष दोन्ही गटांमध्ये द्वितीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद तसेच ओव्हरऑल जनरल चॅम्पियनशिपमध्ये तृतीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेत महाराष्ट्रातील २२ विद्यापीठांच्या संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने यश संपादन केले. ॲथलेटिक्स मुलींच्या आणि मुलांच्या संघाने दोन्ही गटात प्रथमच जनरल चॅम्पियनशिप मिळवून इतिहास घडविला. त्याचबरोबर सांघिक खेळामध्ये कबड्डी (पुरुष) व बास्केटबॉल महिला संघाने रौप्यपदक पटकावले. खो-खो (महिला व पुरुष) तसेच बास्केटबॉल (पुरुष) हे तिन्ही संघ कांस्यपदकांचे मानकरी ठरले.